# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः29.01.2025** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या**

१. शंभराव्या अग्निबाणाचं प्रक्षेपण करत इस्त्रोनं रचला ईतिहास

२. 38 व्या राष्ट्रीय क्रिडा स्पर्धांचं पंतप्रधानांच्या हस्ते उद्घघाटन

३. मौनी अमावस्येनिमित्त दुसऱ्या अमृतस्नानासाठी प्रयागराज इथं भाविकांची गर्दी

४. पंतप्रधानांनी कुंभमेळ्यातील आजच्या नियोजनाचा घेतला आढावा

आणि

५. 19 वर्षांखालील महिला क्रिकेटमध्ये भारतीय संघाचा स्कॉटलँडवर विजय

**इस्त्रो**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्त्रोनं आज सकाळी सहा वाजून 23 मिनिटांनी जीएसएलव्ही एफ -फिफ्टीन या शंभराव्या अग्निबाणाचं यशस्वी प्रक्षेपण करत, अग्नीबाण प्रक्षेपणाची ऐतिहासिक शतकपूर्ती केली. श्रीहरीकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रातून एनव्हीएस झिरो टू हा उपग्रह घेऊन जाणाऱ्या या अग्निबाणानं यशस्वी उड्डाण केलं आणि उपग्रहाला त्याच्या कक्षेत स्थापित केलं आहे. एनव्हीएस ओ टू हा उपग्रह दूरसंचार, दिशादर्शन आणि हवामान क्षेत्रासाठी उपयुक्त ठरणार आहे. इस्त्रोसाठी ही एक ऐतिहासिक कामगिरी आाहे, अशा शब्दात इस्त्रोचे प्रमुख व्ही. नारायणन यांनी आनंद व्यक्त केला. प्रजासत्ताक दिनाच्या समारंभाचा समारोप आज बिटींग द रिट्रिट कार्यक्रमानं नवी दिल्लीतील विजय चौक इथं होणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि इतर केंद्रीय मंत्री या प्रसंगी उपस्थित राहतील. सेनादल, नौदल, हवाई दल आणि केंद्रीय सशस्त्र पोलिस दलातील बँड या समारंभात एकंदर 30 विविध प्रकारचं सादरीकरण करणार आहेत.

**राष्ट्रीय-क्रिडा**

एक भारत श्रेष्ठ भारत उपक्रमाचं महत्व अधोरेखित करणाऱ्या 38 व्या राष्ट्रीय क्रिडा स्पर्धांचं उद्घाटन उत्तराखंडमधील देहरादून इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल झालं. उद्घाटन समारंभात उत्तराखंडच्या लोकसंस्कृती आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा एक अनोखा मिलाफ दिसून आला. केंद्रीय मंत्री, भारतीय ऑलिंपिक संघटनेचे अधिकारी आणि राष्ट्रीय खेळाडूंसह अनेक मान्यवर या समारंभाला उपस्थित होते. 2036 च्या ऑलिंपिकचं आयोजन करण्यासाठी भारत जोरदार प्रयत्न करत असल्याचं पंतप्रधान यावेळी बोलताना म्हणाले. पुढील महिन्याच्या 14 तारखेपर्यंत उत्तराखंडच्या 8 जिल्ह्यांतील 11 शहरांमध्ये राष्ट्रीय खेळांचे आयोजन केले जात आहे. या कार्यक्रमादरम्यान 35 क्रीडा प्रकारांच्या एकूण 47 स्पर्धांचं आयोजन केलं जाणार आहे.

**प्रयागराज**

उत्तरप्रदेशमधील प्रयागराज इथं कुंभमेळ्यात मौनी अमावस्येनिमित्त आज अमृतस्नानासाठी लाखो भाविक दाखल झाले आहेत. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याबरोबर आज संवाद साधला आणि महाकुंभमधील आजच्या नियोजनाचा तसंच सध्याच्या परिस्थितीचा आढावा घेतला. जनहितासाठी काही वेळापुर्वी आखाड्याचं स्नान रद्द करण्यात आलं आहे. गर्दीमुळे काही भाविक महिलांची प्रकृती खालावल्याचं वृत्त आहे. कुंभमेळा परिसरांत आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी सात स्तरीय सुरक्षा यंत्रणा तैनात करण्यात आली असून वाहन विरहित क्षेत्र तसंच अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठीचं व्हिआयपी विरहित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलं आहे. आरोग्य यंत्रणा, हवाई रुग्णवाहिका आदी व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. दरम्यान, यात्रेकरुंची गर्दी लक्षात घेता, भाविकांनी ते कुंभमेळ्याच्या ज्या भागात आहेत तिथल्या नजिकच्या घाटावर स्नान करावं. संगमस्थळी जाण्याचा अट्टाहास करु नये अशी विनंती मेळा प्रशानानं आज सकाळी केली आहे. देशभरातील विविध ठिकाणांहून 190 विशेष रेल्वेगाड्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.

**सर्वपक्षीय-बैठक**

येत्या शुक्रवारपासून सुरु होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या वतीनं उद्या सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारमण येत्या शनिवारी अर्थसंकल्प सादर करणार आहेत.

**हरियाणा**

हरियाणा सरकारविरुद्ध आम आदमी पक्षाच्या यमुना पाण्यात विषबाधा झाल्याच्या आरोपावरून भाजपने काल निवडणूक आयोगाकडे धाव घेतली. केंद्रीय मंत्री निर्मला सीतारमण आणि भूपेंद्र यादव, हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सैनी आणि इतरांचा समावेश असलेल्या पक्षाच्या शिष्टमंडळाने नवी दिल्लीत आयोगाची भेट घेतली. अरविंद केजरीवाल यांना दिल्लीत प्रचार करण्यापासून रोखण्यासाठी कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे असं या बैठकीनंतर माध्यमांना संबोधित करताना अर्थमंत्री सीतारमण यांनी सांगितलं. दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी आणि पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनीही निवडणूक आयोगाची भेट घेतली. हरियाणाहून येणाऱ्या यमुना नदीच्या पाण्यात अमोनियाची पातळी विषारी पातळीपर्यंत कशी पोहोचली आहे याची माहिती आतिशी यांनी पक्षाच्या वतीनं निवडणूक आयोगाला दिली.

**एस जयशंकर**

वेगाने बदलणाऱ्या जागतिक परिस्थितीत भारत-पश्चिम आशिया संबंधांचे महत्त्व वाढत असल्याचं परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल अधोरेखित केलं. अबू धाबी इथं झालेल्या रायसीना संवादाच्या उद्घाटन सत्रात मुख्य भाषण देताना, डॉ. जयशंकर यांनी गेल्या दशकात भारत आणि पश्चिम आशियामधील मजबूत व्यापार, दळणवळण आणि सांस्कृतिक संबंधांमुळे दृढ झाला असून भारत पश्चिम आशियाला इतर जगासाठी प्रवासासाठीचा उत्तम मार्ग म्हणून पाहिले जाते आहे.

**भारत-कॅनडा**

कॅनडामध्ये भारतीय यंत्रणांचा कथित हस्तक्षेप असल्याचा कॅनडा सरकारच्या अहवालाचं भारतीय परराष्ट्र मंत्रालयानं खंडन केलं आहे. उलट कॅनडा भारताच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करत असल्याची टीका भारतानं केली आहे. अशा हस्तक्षेपामुळे अनधिकृत स्थलांतर आणि गुन्हेगारी प्रवृतीला खतपाणी घालतात, या

अहवालातील भारताविषयीचे आक्षेप फेटाळून लावले तसंच बेकायदा स्थलांतरास सक्षम करणारी यंत्रणा यापुढे स्वीकारली जाणार नाही असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे.

**भारत-श्रीलंका**

डेल्फ्ट बेटाजवळ 13 भारतीय मच्छिमारांना ताब्यात घेत असताना श्रीलंकेच्या नौदलाने केलेल्या गोळीबाराच्या घटनेनंतर भारताने श्रीलंकेकडे तीव्र निषेध नोंदवला आहे. ही घटना काल सकाळी घडली, ज्यामध्ये दोन मच्छिमार गंभीर जखमी झाले, तर इतर तीन जण किरकोळ जखमी झाले. नवी दिल्लीतील श्रीलंकेच्या कार्यवाहक उच्चायुक्तांना परराष्ट्र मंत्रालयात बोलावून औपचारिकरित्या निषेध नोंदवण्यात आला. कोलंबोमधील भारतीय उच्चायुक्तालयानंही श्रीलंकेच्या सरकारसमोर हा मुद्दा उपस्थित केला आहे.

**दिल्ली**

दिल्ली विधानसभेच्या 70 जागांसाठी होणाऱ्या निवडणूकीसाठी राजकीय वातावरण तापू लागलं आहे. भाजपा, आम आदमी पक्ष आणि काँग्रेस पक्षाच्या वतीनं विविध भागात रॅली, रोडशो मतदारांची प्रत्यक्ष भेट घेत आहेत. मतदान येत्या 5 तारखेला होणार असून 8 तारखेला मतमोजणी होईल.केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांनी काल कस्तुरबा नगर इथं रोडशो केला तसंच कालकाजी भागात प्रचारसभेला संबोधित केलं. यमुना नदी पाणीप्रश्नाबाबत शहा यांनी आपचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांच्यावर टिका केली. राजेंद्रनगर भागातील मंगोलपुरी आणि विकासपुरी इथं उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी प्रचारसभेला संबोधित केलं. आपल्या पक्षाचं सरकार आल्यास दिल्लीकरांना मोफत वीजपुरवठा दिला जील असं आश्वासन अरविंद केजरीवाल यांनी घोंडा भागात आयोजित प्रचारसभेला संबोधित करताना दिलं. तर केजरीवाल यांनी आपल्या राहत्या घराचं सुशोभिकरणावर करण्यावर काँग्रेसच्या राहुल गांधी यांनी टिका केली.

**क्रिकेट**

भारत आणि इंग्लंड यांच्यात काल राजकोट इथल्या निरंजन शाह मैदानावर झालेल्या तिसऱ्या 20 षटकांच्या क्रिकेट सामन्यात इंग्लंडनं भारताचा 26 धावांनी पराभव केला. इंग्लंडनं दिलेल्या 172 धावांचं उद्दिष्ट गाठताना भारतीय संघानं निर्धारित 20 षटकांत नऊ गडी गमावून केवळ 145 धावा केल्या. या पराभवानंतरही, सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ पाच सामन्यांच्या या मालिकेत 2-1 नं आघाडीवर आहे. मालिकेतला चौथा सामना शुक्रवारी पुण्यातील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर होणार आहे.

**महिला क्रिकेट**

20 षटकांच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत 19 वर्षांखालील महिलांच्या गटात क्वालालंपूर इथं काल झालेल्या सामन्यात भारतानं स्कॉटलंडचा 150 धावांनी पराभव केला. भारतानं दिलेल्या 209 धावांचं उद्दिष्ट गाठताना स्कॉटलंडचा संघ 14 षटकांत केवळ 58 धावा करून सर्व बाद झाला. भारताकडून आयुषी शुक्लाने चार तर वैष्णवी शर्मा आणि गोंगादी त्रिशानं प्रत्येकी तीन बळी घेतले. तत्पूर्वी, भारतीय संघाने निर्धारित 20 षटकांत फक्त एक बळी गमावून 208 धावा केल्या. भारताकडून गोंगादी त्रिशाने 59 चेंडूत सर्वाधिक 110 धावा केल्या आणि नाबाद राहिला, तर जी. कमलिनीने 42 चेंडूत 51 धावा केल्या. स्कॉटलंडच्या माईसी मासेइरा हिनं एक बळी घेतला.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार**